

"येरे येरे पैसा ३"पैसा वसूल सिनेमा!

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 20/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 160 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com

# नागरिकांच्या प्राप्त होणाऱ्या तक्रारी गांभीर्याने घ्या-अजित पवार

## अजित पवार यांच्याकडून बारामती शहरातील विविध विकास कामांची पाहणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : शहरात भटकी जनावरे, कुत्र्यांचा वावर तसेच त्याबाबत नागरिकांच्या प्राप्त होणाऱ्या तक्रारी गांभीर्याने घेत नगरपरिषदेने बंदोबस्त करावा, त्यासाठी शहरातील विविध भागात कोंडवाड्याकरिता जागा निश्चित करुन प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.**



बारामती परिसरातील श्री सिद्धेश्वर मंदिर परिसर, दशक्रिया घाट, शारदा प्रांगण येथील सुरु असलेली विविध विकास कामे, प्रस्तावित माळावरची देवी ते जळोची चौक चारपदरी रस्ता, जळोची कॅनाल पुलावरून संभाजीनगरकडे जाणारा रस्ता, कॅनाल लगतची गार्डन जागा, जळोची ओढ्याशेजारील दशक्रिया घाट, दहनभूमी, दफनभूमी जागा, रुई हद्दीतील विद्या प्रतिष्ठान शेजारील दोन लहान पूल, गार्डन, स्मशानभूमी, पूर संरक्षण भिंतीच्या प्रस्तावित जागेची पाहणी करुन संबंधित अधिकाऱ्यांकडून पाहणी केली.

प्रस्तावित जागेवर करण्यात येणाऱ्या कामांची पाहणी करुन श्री. पवार म्हणाले, बारामती परिसरातील हद्दवाढ लक्षात घेता प्रस्तावित जागेवर कामे सुरु करावीत. कामात अडथळा आणणाऱ्यावर पोलिसांनी कारवाई करावी. या परिसरातील रुई-जळोची ओढा रुंदीकरणाची कामे करताना मोजणी करुन त्यामध्ये अतिक्रमण असल्यास ती काढावीत. या ओढ्याच्या दोन्ही बाजूस पूर संरक्षण भिंतीचे बांधकाम करावे. शारदा प्रांगण परिसरात उभारण्यात येणाऱ्या सीबीएसई आणि मराठी शाळेत विद्यार्थी व शिक्षकांना लागणाऱ्या पायाभूत सुविधांचा विचार करुन इमारत व परिसर विकसित करा. पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांकरिता सोयी-सुविधांचा करुन शौचालय, पाणी, विद्युत व्यवस्था आदींच्या अनुषंगाने कामे करावीत. बाबूजी नाईक वाडा, दशक्रिया घाट परिसरात सावली देणारी झाडे लावावीत. दशक्रिया घाट परिसरामध्ये अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना आवश्यक त्या सर्व सुविधा मिळतील याद्दष्टीने नियोजन करुन कामे करावीत. पाणी साचणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. कविवर्य मोरोपंत यांच्या स्मारकाची आवश्यक ती डागडुजी करुन घ्यावी. नदी पात्रातील ड्रेनहोल चेंबर्सला आवश्यक अंतर सोडून वृक्षारोपण करावे.

बारामती परिसरात विविध विकासकामे सुरु असून आगामी काळात होणारी हद्दवाढीचा विचार करुन पुढची शंभर वर्ष उपयोगात येईल, तसेच कामे करताना ती देखभाल विरहित झाली पाहिजेत, याद्दष्टीने नियोजन करून कामे करा, असे निर्देश पवार यांनी दिले.

# आ. अमित गोरखे यांनी पावसाळी अधिवेशन गाजवले

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**महाराष्ट्र विधान परिषद आणि विधानसभेचे पावसाळी अधिवेशन नुकतेच संपले. यंदाचे अधिवेशन अनेक कारणांनी गाजले, या पावसाळी अधिवेशनात पिंपरी चिंचवड शहरातील विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी चिंचवड शहरातील विविध प्रश्नांवर लक्षवेधी सूचना तारांकित प्रश्न आणि अनेक मुद्दे मांडले त्यांच्या प्रश्नांना सकारात्मकता मिळाल्याचे पहावयास मिळाले. याबाबत आयोजित पत्रकार परिषदेत अमित गोरखे यांनी माहिती दिली.**




या पत्रकार परिषदेत पिंपरी चिंचवड शहर भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, महिला आघाडीच्या शहराध्यक्ष माजी नगरसेविका सुजाता पलांडे, माजी नगरसेवक शितल शिंदे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी नगरसेवक मोरेश्वर शेंडगे, माजी नगरसेवक राजदुर्गे,माजी नगर सेवक राजेश पिल्ले यांच्या सह भाजप चे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, मोठ्या संख्येने हजार होते.

यूपीएससी एमपीएससी या स्पर्धा परीक्षेत अंतिम फेरीपर्यंत पोहोचलेल्या परंतु निवड न झालेल्या उमेदवारांसाठी "प्रतिभा सेतू" सारखा प्रकल्प राबवावा. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जाती जमातीतील धर्मांतरित नागरिकांच्या सवलती बंद कराव्यात, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयीची माहिती देणारा अभ्यासक्रम सीबीएससी च्या पाठ्यपुस्तकात समाविष्ट करावा, अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार द्या, पिंपरी चिंचवड शहराच्या प्रारूप विकास आराखड्यात त्रुटी असल्यामुळे तो रद्द करावा. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या मागील पोलीस स्टेशनचे आरक्षण रद्द करून तेथे असणारे नियोजित माता रमाई आंबेडकर यांचे स्मारक विकसित करावे. राज्य सरकारमधील खेळाडूंना सन्मानपूर्वक बढती मिळावी. तसेच राज्यात इ गव्हर्नन्स द्वारे रिक्त पदे भरून जुनी पेन्शन योजना लागू करावी, बाल गुन्हेगारी व सोशल मीडिया मधील गैरवापर रोखण्यासाठी कडक कायदे करावेत, भटक्या श्वानांचा उपद्रव रोखण्यासाठी धोरण निश्चित करावे. राजकीय व सामाजिक आंदोलनात कार्यकर्त्यांवर झालेले गुन्हे मागे घ्यावेत व यासाठी नेमलेल्या समितीच्या नियमित बैठका घ्याव्यात. अनेक ठिकाणी सार्वजनिक स्मशानभूमी मध्ये अंत्यविधी करताना जात, धर्म, वर्ग असा भेदभाव करून नागरिकांना त्रास दिला जातो. त्या गावातील पोलीस निरीक्षक व महसूल अधिकाऱ्यांना थेट जबाबदार धरून घटनेनंतर संबंधितांवर २४ तासात अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा व पीडित कुटुंबांना तातडीची मदत, संरक्षण आणि सन्मानाची वागणूक द्यावी. राज्यातील अनेक ठिकाणी सांस्कृतिक सभागृहांमधील शनिवार, रविवार व इतर सुट्टीच्या दिवसातील अनेक कार्यक्रम ऐनवेळी राजकीय व शासकीय कार्यक्रमांमुळे अचानक रद्द केले जातात त्यामुळे कलाकारांचे आर्थिक नुकसान होते यासाठी निश्चित धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी करावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात आयुर्वेदिक औषध उपचार व आयुर्वेदिक चिकित्सा विभाग पुन्हा सुरू करावा. मावळ मौजे उर्से येथील शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी तात्काळ एसआयटी नेमून उच्चस्तरीय चौकशी करावी अशा विविध प्रश्नांवर मला विधान परिषदेत शासनाचे लक्ष वेधता आले, अशी माहिती आमदार अमित गोरखे यांनी दिली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 20/07/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# बापू कातळे यांच्या वतीने मोफत आधार कार्ड अभियानाचे आयोजन !

## अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अभियानाचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी चिंचवड शहरात वेगवेगळ्या पद्धतीने उपक्रम, अभियानाचे आयोजन करीत अजित पवार यांचे वाढदिवस साजरा करण्यात येत आहे. दरम्यान, चिंचवड विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस उपाध्यक्ष तथा संकल्प सोशल फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष बापू दिनकर कातळे यांच्या वतीने शहरातील नागरिकांसाठी मोफत आधार कार्ड अभियान राबविण्यात येत आहे, अशी माहिती बापू कातळे यांनी दिली.

या मोफत आधार कार्ड अभियाना अंतर्गत नवीन आधार कार्ड नोंदणी, एक ते पाच वयोगटातील नवीन आधार कार्ड नोंदणी, आधार कार्ड ला मोबाईल नंबर लिंक करणे, आधार कार्ड दुरुस्त करणे, सदर कामे रविवार (दि. २०) जुलै रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत संगीता अपार्टमेंट समोर, दांगट वस्ती, विकास नगर येथे अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत शहरातील तसेच प्रभागातील नागरिकांसाठी मोफत आधार कार्ड सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मोफत आधार कार्ड अभियानाचा लाभ घेण्याकरिता प्रसाद राऊत व मनीष गायकवाड यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन बापू कातळे यांनी केले आहे.

तसेच या अभियानाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन देखील बापू कातळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.




# शहरात साप्ताहिक स्वच्छता मोहीम ; नागरिकांचाही पुढाकार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या जनजागृती मोहिमेअंतर्गत संपूर्ण शहरात साप्ताहिक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

विशेषतः भाजी मंडई, सार्वजनिक स्वच्छतागृहे व त्याच्या आसपासच्या परिसरांमध्ये स्वच्छता उपक्रम राबवून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमांतर्गत 'ह' क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक ३२ राजीव गांधी भाजी मंडई, जुनी सांगवी येथे विशेष स्वच्छता मोहिमेचे राबविण्यात आली.

या मोहिमेत पिंपरी चिंचवड महापालिका सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक दीपक कोटीयान,आरोग्य निरीक्षक संदीप राठोड, आरोग्य मुकादम वैशाली रणपिसे व नारायण शितोळे यांच्यासह अन्य महापालिका कर्मचारी आदी सहभागी झाले होते.

स्वच्छता मोहिमेदरम्यान नागरिकांना डेंग्यू व मलेरिया या रोगांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच, प्रतिबंधक उपाययोजना, घराच्या व परिसराच्या स्वच्छतेसाठीच्या सवयी, कचरा विलगीकरणाचे महत्त्व, एकल प्लास्टिक टाळण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी कापडी पिशव्यांच्या वापराचा आग्रह धरून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले.

परिसरातील पालापाचोळा, गवत, प्लास्टिक, कागद, पुठ्ठा यांसारख्या कचऱ्याचे संकलन करून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. मोहिमेमध्ये स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत महापालिकेला सहकार्य केले.

# शहरात 'आप' स्वबळावर लढणार व महापौर बसणार - विजय कुंभार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

आम आदमी पार्टी, पिंपरी चिंचवडच्या वतीने रविवार, दि. १९ जुलै रोजी घरोंदा हॉटेल, मोरवाडी, पिंपरी येथे नियुक्ती पत्र व पक्ष प्रवेश कार्यक्रम संपन्न झाला.कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी यावेळी आम आदमी पार्टीमध्ये प्रवेश केला या मध्ये एडवोकेट के.एम.रॉय, ओबीसी समाजासाठी उत्तम काम करणारे राहुल मदने,

सामाजिक कार्यकर्ते विकी पासोटे, सामाजिक कार्यकर्ते, शुभम गाडेकर इत्यादी कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला तसेच शहरातील नवनियुक्त




पदाधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आपचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष मा. विजय कुंभार होते, तर शहराध्यक्ष रविराज बबन काळे यांनी आयोजनाची धुरा सांभाळली. आगामी पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक आम आदमी पार्टी स्वबळावर लढवणार आहे. पालिका निवडणुकीच्या तयारीला लागा. आपचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष मा. विजय कुंभार यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केलं आहे. तर आम आदमी पार्टी हा पिंपरी चिंचवडमध्ये भक्कम पर्याय म्हणून उभा राहणार आहे. येत्या महापालिका निवडणुकीत 'आप'चा झेंडा पिंपरी चिंचवडच्या प्रत्येक भागात नक्कीच फडकणार,

असा विश्वास पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रविराज बबन काळे यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात पक्षवाढ, संघटन बळकट करण्याचा निर्धार करण्यात आला.'आप'चा झेंडा संपूर्ण शहरात फडकवण्याचा संकल्प सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पक्षाचे महासचिव सचिन पवार, वरिष्ठ उपाध्यक्ष वैजनाथ शिरसाट, प्रवक्ते सुरेश गायकवाड, उपाध्यक्ष डॉक्टर अनिल रॉय व संपूर्ण पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.पक्षाच्या वतीने त्यांचे आभार मान्यात आले आहेत.

# आपत्ती व्यवस्थापन आणि बचाव कौशल्यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या वतीने विभागातील यंत्रसामग्री, उपकरणे आणि वाहनांची कार्यक्षमता तपासण्यासाठी तसेच नव्याने नियुक्त अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास सक्षम करण्यासाठी विशेष उजळणी आणि प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले.या प्रशिक्षण सत्रात अग्निशमन सेवेत नुकतेच सरळसेवेने नियुक्त झालेले अधिकारी आणि कर्मचारी तसेच



कार्यरत अनुभवी कर्मचारी सहभागी झाले होते. यामध्ये अग्निशमन सेवा, आपत्ती व्यवस्थापन, घटनास्थळी त्वरीत कृती, तांत्रिक कौशल्ये, आणि विविध उपकरणांच्या वापराबाबत सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.

सत्रात रनिंग, पी.टी., स्कॉट ड्रिल, बचाव उपकरणे, रोप रॅपलिंग, न्यूमॅटिक एअर लिफ्टिंग बॅग, हायड्रॉलिक उपकरणे, आस्का लाइट, बीए सेट आणि बीए व्हॅन, तसेच अंडर वॉटर कॅमेरा, बोटिंग, लिफ्ट रेस्क्यू, ईव्ही फायर, क्लोरीन गळती रेस्क्यू, गॅस डिटेक्टर, सीपीआर, हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म, फोम टेंडर इत्यादींचा वापर प्रत्यक्ष सरावाद्वारे शिकवण्यात आला. याशिवाय शहराची टोपोग्राफी, हॉस्पिटल आणि मॉल व्हिजिट, फायर सप्रेशन सिस्टम, फायर पंप आणि विविध ड्रिल्सही सत्राचा भाग होते.

ही उजळणी मोहीम उप अग्निशमन अधिकारी विकास नाईक आणि रुपेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

याच पद्धतीने इतर उपकेंद्रांमध्येही अशा प्रकारचे सत्रे राबवण्याचा विभागाचा मानस असून, विभागाची १०० टक्के कार्यक्षमता साधण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# सायबर चोरट्यांकडून ८२ लाखांची फसवणूक!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : सायबर चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत आमिष दाखवून चौघांची ८२ लाख ३५ हजारांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कात्रज भागातील आंबेगाव बुद्रुक परिसरात राहणाऱ्या एकाची सायबर चोरट्यांनी शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने २३ लाख १९ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत एकाने आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदाराच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्यांनी एप्रिल महिन्यात संपर्क साधला होता.चोरट्यांनी त्यांना गुंतवणुकीचे आमिष दाखवून त्यांना एका समाजमाध्यमातील समुहात सहभागी करुन घेतले. गुंतवणूक योजनांची माहिती देऊन त्यांना जाळ्यात ओढले. चोरट्यांनी त्यांना रकम गुंतविण्यास सांगितले. सुरुवातीला चोरट्यांनी त्यांना परतावा दिला. त्यानंतर चोरट्यांनी त्यांना आणखी रकम गुंतविण्यास सांगितले. चोरट्यांच्या खात्यावर त्यांनी वेळोवेळी २३ लाख १९ हजार रुपये जमा केले. रकम जमा केल्यानंतर चोरट्यांनी त्यांना परतावा दिला‍ा नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन चोरमले तपास करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
रविवार दिनांक 20/07/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# "येरे येरे पैसा 3" पैसा वसूल सिनेमा!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**येरे येरे पैसा ३ हा सिनेमा पैसा वसूल झालाय का? तर खरं सांगायचं म्हणजे मनोरंजनाच्या दृष्टिकोनातून हा सिनेमा पैसा वसूल सिनेमा झालाय . चित्रपटाच्या सुरुवातीलाच चित्रपटाचे दिग्दर्शक संजय जाधव हे पडद्यावर येऊन सांगतात की हा चित्रपट पाहताना कोणीही चित्रपट कसा झाला आहे चित्रपटाचा फर्स्ट हाफ चांगला होता की सेकंड हाफ चांगला होता या भानगडीत न पडता हा चित्रपट सर्वांनी एन्जॉय करावा. म्हणजेच काय तर हा चित्रपट फक्त आणि फक्त मनोरंजन करणारा आहे.**




पैसा, या चित्रपटाच्या कथेच्या नायकच पैसा आहे ,प्रत्येकाला पैसा हवाय, या सिनेमातील सगळीच पात्र आपल्या जीवनात अडचणींचा सामना करत आहेत आणि या अडचणी सोडवण्यासाठी सर्वांनाच पैसा लागतोय या चित्रपटाची नायिका बबली म्हणजेच तेजस्विनी पंडित एका बारमध्ये सिंगर म्हणून काम करते तिला युरोपला जाऊन मोठी गायिका व्हायचंय , आपलं टॅलेंट दाखवायचय ,त्यासाठी तिला पैसे लागतात तर दुसरं पात्र आहे सनी,म्हणजेच सिद्धार्थ जाधव , तो जिम ट्रेनर आहे आणि बबलीशी प्रेम करतो व यातूनच तो मोठ्या अडचणीत सापडतो त्यालाही पैशाची गरज आहे तर तिसरं पात्र आहे उमेश कामत त्याला मोठा सिनेस्टार व्हायचय पण त्याच्याकडे पैसे नाही आणि सर्वात इंटरेस्टिंग पात्र झाले संजय नार्वेकरचं म्हणजेच या चित्रपटातील अण्णा या सर्वांना एक दोन नाहीतर पाच करोडची आवश्यकता आहे आणि हे पाच करोड मिळविण्यासाठी ते सर्व जे धमाल करतात ते पाहणं खूपच मनोरंजक झालंय.

या चित्रपटाची एडिटिंग ही या चित्रपटाची जमेची बाजू सांगावी लागेल. या चित्रपटातील पात्रांच्या जीवनात एकाच वेळी अनेक घटना घडत असतात आणि या सर्व घटना प्रभावी पद्धतीने दाखविण्यात आल्या आहेत यामध्ये एडिटिंगचा खूप महत्त्वाचा वाटा आहे.एडिटिंग अशा प्रकारे करण्यात आली आहे की फर्स्ट हाफ मध्ये जितके प्रश्न उपस्थित होतात त्या सर्व प्रश्नांची उत्तरे सेकंड हाफ मध्ये मिळतात.

या चित्रपटाचे संगीत चांगले झाले आहे या चित्रपटातील गाणी यापूर्वीच लोकप्रिय झाली आहे उडत गेला सोन्या, आली रे आली गुलाबाची कली, व टायटल सॉंग येरे येरे पैसा तिर्री हे गाणे चांगलेच जमून आले आहे. तसेच बबली ही गायिका असल्याने ती जेव्हा जेव्हा चित्रपटात वेगवेगळ्या प्रसंगी गाणे गाते या यावेळी आशा भोसले यांनी गायलेल्या हिंदी चित्रपटातील गाण्यांचे कडवे वेळोवेळी आपल्याला ऐकावयास मिळतात हेही खूप चांगले जमून आले आहे. तसेच उडत गेला सोन्या या गाण्यांमध्ये कव्वालीचा धरलेला ट्रॅकही आपल्याला ऐकावयास मिळतो.

या चित्रपटात सर्वांचाच अभिनय चांगला झाला आहे सिद्धार्थ जाधव, तेजस्विनी पंडित उमेश कामत संजय नार्वेकर वनिता खरात या सर्वांनीच आपल्या अभिनयाने धम्माल उडून गेली आहे.

दिग्दर्शक संजय जाधव यांनी आपले काम योग्य पद्धतीने केले आहे. सिनेमाच्या सर्व टीम ने चांगली मेहनत घेतलेली आपल्याला पाहावयास मिळते तर हा चित्रपट एकदा तरी चित्रपटगृहात जाऊन पहावा असा झाला आहे म्हणजेच हा चित्रपट पैसा वसूल चित्रपट झाला असून चित्रपटगृहातच जाऊनच या चित्रपटाचा आनंद घ्यावा.